# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक


संदर्भ क्र: विविमं/२०२४–२५/६२८ दिनांक : १४/०९/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व संबंधित शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय : एकदिवसीय राज्यस्तरीय ''महिला सुरक्षितता आणि शिष्यवृत्ती'' कार्यशाळेबाबत...**
**संदर्भ क्र : ससं/उशि/महिला सुरक्षितता कार्य. २०२४/६८७७ दि. १३/०९/२०२४ चे पत्र.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदभीर्य विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली केंद्र शासनाचे प्रसिध्द केलेली मार्गदर्शक तत्वे आणि उक्त नमूद उपाययोजनांची प्रभावी अमंलबजावणी होण्याच्या अनुषंगाने राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, महाविद्यालये, शासकीय संस्था, मुलींचे वसतिगृहांमधील विद्यार्थीनींच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुरक्षेसाठी महिला कायद्यांची ओळख व्हावी यादृष्टीने राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांमध्ये **''महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती''** या विषयावर दि. २० सप्टेंबर, २०२४ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

सदर कार्यशाळा मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली असून या कार्यशाळेस मा. श्री. विकासचंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

शासन निर्देशानुसार पुणे जिल्हयाची एक दिवसीय विभागस्तरीय **''महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती''** या विषयावर कार्यशाळा शुक्रवार, दि. २० सप्टेंबर, २०२४ रोजी इरावती कर्वे सभागृह, सेट गेस्ट हाऊसजवळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे सकाळी ०९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत उपस्थित रहावे.

मा. सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग, पुणे १ यांच्या निर्देशानुसार दि. १८ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी ४.३० वाजता या संदर्भात सर्व प्राचार्यांनी ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आलेली असून या बैठकीस सर्व प्राचार्यांनी ऑनलाईन उपस्थित रहावे. यासाठीची आवश्यक ती लिंक मेलवर तसेच व्हॉटसअप ग्रुपवर देण्यात येईल.

कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**महाराष्ट्र शासन**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

क्रमांक -ससं/उशि/महिला सुरक्षितता कार्य.२०२४/६८७७ दि. १३/०९/२०२४

प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७.
२. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, पुणे विभाग.
३. प्राचार्य/प्राचार्या, सर्व अशासकीय अनुदानित व कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय - **एकदिवसीय राज्यस्तरीय "महिला सुरक्षितता आणि शिष्यवृत्ती" कार्यशाळेचे आयोजन करणेबाबत..**

संदर्भ - मा. शिक्षण संचालक, उ.शि.म.रा. पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/२०२४/महिला सुरक्षा/कार्यशाळा/प्रशा-३/४४४५ दि. ११.९.२०२४.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, केंद्र शासनाचे प्रसिध्द मार्गदर्शक तत्वे आणि उक्त नमूद उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या अनुषंगाने राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे, महाविद्यालये, शासकीय संस्था, मुलींचे वसतिगृहांमधील विद्यार्थीनींच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुरक्षेसाठी महिला कायदयाची ओळख व्हावी यादृष्टीने राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांमध्ये **"महिला सुरक्षितता आणि शिष्यवृत्ती"** या विषयावर **दिनांक २० सप्टेंबर, २०२४** रोजी एक दिवसीय कार्यशाळा अयोजित करण्यात आली आहे.

सदर कार्यशाळेस अध्यक्ष म्हणून ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य आणि मा. श्री. विकासचंद्र रस्तोगी, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

**सदर कार्यशाळेस आपण दिनांक २० सप्टेंबर, २०२४ रोजी इरावती कर्वे सभागृह, सेट गेस्ट हाऊसजवळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत उपस्थित रहावे.**

**दिनांक १८ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी ४.३० वाजता** या संदर्भात सर्व प्राचार्यांची ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आलेली असून या बैठकीस सर्व प्राचार्यांनी ऑनलाईन उपस्थित रहावे. यासाठीची आवश्यक ती लिंक मेलवर तसेच व्हॉटसअप ग्रूपवर देण्यात येईल.

**(डॉ.केशव तुपे)**
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत - वरीलप्रमाणे मा. शिक्षण संचालक, यांचे पत्र.